# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# बाळासाहेब देसाई कॉलेज व रोटरी क्लब, पाटणचा निर्माल्य संकलन उपक्रम स्तुत्य

पाटण, दि. १० : येथील बाळासाहेब देसाई कॉलेज व रोटरी क्लब, पाटण तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभाग, एन. सी. सी. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गौरी गणपती विसर्जनाच्या दिवशी निर्माल्य संकलनाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळाला.

गणपती विसर्जनाच्यावेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक, रोटरी क्लबचे सदस्य, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक पाटणमधील विविध विसर्जनस्थळी उभे राहून निर्माल्य दान करण्याबाबत आवाहन करत होते. या उपक्रमास प्रत्येक वर्षी प्रतिसाद वाढत असल्याचे कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण यांनी सांगितले. २००६ पासून आम्ही हा उपक्रम राबवित आहोत. सुरुवातीच्या काळात आम्हाला व्यवस्थितरित्या प्रतिसाद मिळत नव्हता. मात्र आम्ही लोकभावनेचा आदर करून, त्यांना प्रबोधन करून निर्माल्यामुळे नदीचे होणारे प्रदूषण याची व्यवस्थितपणे माहिती सांगितल्यामुळे लोकांच्यात आता बदल होत आहे. लोक पर्यावरणपूरक उत्सव साजरा करत असल्याने आमच्या या उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळून जवळपास २ ट्रॅक्टर निर्माल्य एकत्रित केले असून आम्ही ते नगरपंचायतीच्या माध्यमातून त्याची योग्य रीतीने विल्हेवाट लावणार असल्याचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांनी सांगितले.

> निर्माल्य आपल्या घरातील कुंड्या किंवा अंगणातील झाडांना अर्पण केले तर त्याचे खत तयार होऊन एक पर्यावरणपूरक उत्सव साजरा केल्याचे समाधान लाभते. त्यामुळे निर्माल्य संकलनाला सहयोग द्यावा, असे आवाहन कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक याज्ञसेन पाटणकर यांनी केले.



निर्माल्य दान उपक्रमप्रसंगी अविनाश कवठेकर व प्राध्यापक.

या निर्माल्य संकलन उपक्रमामध्ये पाटण नगरपंचायतीचे मुख्याधिकारी डॉ. संतोष मोरे, रोटरी क्लबचे अध्यक्ष जगदीश शेंडे, पोलीस उपनिरीक्षक अविनाश कवठेकर, डॉ. शिरीष पवार, एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. बजरंग चव्हाण, डॉ. लक्ष्मण गणगे, डॉ. भरत जाधव, प्रा. विशाल कांबळे, एन. सी. सी. अधिकारी डॉ. संतोष पाटील, बळीराम लोहार, प्रा. एम. एस. आलदार यांनी विशेष परिश्रम घेतले.